# ज्ञान प्रबोधिनी

सौर वैशाख १९४७ चे मासिक वृत्त
सौर ज्येष्ठ १, शके १९४७
दि. २२/५/२०२५

★ ज्ञान प्रबोधिनीच्या तिसऱ्या भवितव्य लेखाचे 'विस्तार' हे साध्यसूत्र आहे. त्याची चार मार्गदर्शक तत्त्वे म्हणजे समावेशकता, नवोन्मेषता, सेतुबंधन व प्रभाव. त्या अनुषंगाने माहे सौर **वैशाखचे** मासिक वृत्त. ★

## प्रश्नोत्तररूप चिंतन

**प्रश्न –** To influence the influentials हे प्रबोधिनीचे एक काम आहे, असे पूर्वी म्हटले जायचे असे ऐकतो. भवितव्य लेखात 'प्रभाव' हे एक मार्गदर्शक तत्त्व मांडले आहे. त्याचा अर्थ पण to influence the influentials असाच आहे का?

**उत्तर –** प्रभाव टाकणे म्हणजे influence करणे. प्रभाव तात्पुरता किंवा दीर्घकालीन असू शकतो. Influence the influentials म्हणताना समाजात ज्यांच्या म्हणण्याला व करण्याला वजन आहे, ज्यांचे ऐकून किंवा पाहून इतर लोक तसे वागायला लागतात, त्यांच्यावर प्रभाव टाकणे असा विचार होता. प्रबोधिनीचे उद्देश व कार्यपद्धती समाजातील प्रभावी लोकांना समजेल, पटेल व महत्त्वाची वाटेल, असे प्रभावी काम प्रबोधिनीने करणे हा to influence the influentials चा अर्थ आहे. या प्रभावी लोकांनी प्रबोधिनीच्या कामाला दुजोरा दिला तर प्रबोधिनीचे काम समाजाच्या सर्व गटांमध्ये जास्त वेगाने व जास्त दूर पसरेल, हा असे म्हणण्यामागचा हेतू होता.

समाजातील प्रभावी लोकांचे कामाचे प्राधान्यक्रम वेगळे असू शकतात व बदलूही शकतात. त्यामुळे त्यांनी प्रबोधिनीच्या कामाला दिलेला दुजोरा तात्पुरता असू शकतो. त्यामुळे त्यांचे ऐकून, पाहून प्रबोधिनीचे अनुसरण करू पाहणाऱ्या लोकांचा त्या बाबतीतला उत्साहही तात्पुरता असू शकतो. प्रभावी लोकांची प्राधान्ये बदलली तर अल्पप्रभावी, म्हणजेच समाजातील उपेक्षित लोकही, आपला मोहरा फिरवू शकतात. कारण प्रभाव 'टाकला' तर तो तात्पुरताही असू शकतो.

चालू भवितव्य लेखात **प्रभाव** या तत्त्वाचे स्पष्टीकरण देताना **influential** लोकांऐवजी **समाजातील सर्व लोकांना आश्वासक, अभिमानास्पद आणि स्वीकारार्ह वाटणे, म्हणजे प्रभाव** असे म्हटले आहे. समाज म्हटले म्हणजे त्यात प्रभावी आणि अल्प प्रभावी दोन्ही आले. अल्प प्रभावी म्हणजेच समाजातील उदासीन व उपेक्षित व्यक्ती.

समाजातील प्रभावी लोकांचे पाहून अल्पप्रभावी लोकांनी प्रबोधिनीची कार्यपद्धती व उपक्रम स्वीकारले तर चांगलेच. पण प्रबोधिनीने अशा अल्पप्रभावी लोकांपर्यंत थेट सुद्धा जाऊन पोचले पाहिजे. प्रबोधिनीला प्रभाव 'टाकण्या'ऐवजी प्रभाव 'पडायला' म्हणजे उपेक्षित व्यक्तींचे कायमस्वरूपी क्षमतावर्धन, वृत्तीघडण व प्रेरणाजागरण व्हायला हवे आहे. म्हणजेच उपेक्षित व्यक्तींनी केवळ स्वतःचा व्यक्तीविकास साधणारे नाही, तर आपापल्या समाजगटाचा आणि समाजाचा विकास करणारे कार्यकर्ते म्हणून उभे राहायला हवे आहे.

या साठीच भवितव्य लेखातील पहिली तीन मार्गदर्शक तत्त्वे ठरवली आहेत. '**समावेशकता**' हे तत्त्व सर्व समाजगट व वयोगटांपर्यंत पोचण्यासाठी विस्तार करण्याचे आहे. त्यातून प्रबोधिनीचे काम समाजाला '**आश्वासक**' वाटावे अशी अपेक्षा आहे. '**नवोन्मेषता**' हे तत्त्व शैक्षणिक बुद्धिमत्तेपलीकडच्या मानवी क्षमतांचा शोध घेऊन त्यांना विकसित व प्रेरित करण्याच्या देशातील व जगातील अभिनव पद्धती निर्माण करून वापरण्याचे आहे. त्यातून प्रबोधिनीचे काम समाजाला '**अभिमानास्पद**' वाटावे अशी अपेक्षा आहे. '**सेतुबंधन**' हे तत्त्व सर्व आर्थिक, सामाजिक, राजकीय आणि सांप्रदायिक रंगछटांच्या कार्यकर्त्यांशी संवाद साधत, समन्वयाने, संघटित काम करण्याचे आहे. त्यातून प्रबोधिनीचे काम समाजाला '**स्वीकारार्ह**' वाटेल अशी अपेक्षा आहे. समाजातील प्रभावी व अल्पप्रभावी लोकांमध्ये नेहमीसाठी प्रभाव पडणे ही व्यापक भूमिका आहे. Influence the influentials हे धोरण या भूमिकेचा एक छोटा भाग होते व आहे.

– गिरीश श्री. बापट

- सौर वैशाख ६ ते ८ (२६ ते २८ एप्रिल) या कालावधीत ज्ञान प्रबोधिनीचे संचालक वाच. गिरीश बापट यांनी चेन्नई मधील ज्ञान प्रबोधिनीच्या संपर्कातील विविध शैक्षणिक संस्थांना भेटी देऊन त्यांचे शैक्षणिक उपक्रम समजून घेतले. यावेळी संस्थाचालक आणि मुख्याध्यापक यांच्यासाठी त्यांचे Nurturing leadership for purpose driven education या विषयावर चर्चासत्र योजले होते. त्याला २२ शाळांमधील ३५ सदस्य उपस्थित होते. Designing life lessons for holistic development या विषयावर अध्यापकांसाठी योजलेल्या व्याख्यानाला २०० अध्यापक उपस्थित होते. चेन्नई स्थित प्रबोधकांचा एक मेळावा योजण्यात आला.

- सौर वैशाख १३ व १४ (३ व ४ मे) रोजी जालना जनजागृती मंडळ व विद्याभारती संस्थेच्या वतीने आयोजित जालना येथील नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंमलबजावणी कार्यशाळेत मा. प्राचार्य मिलिंद नाईक सहभागी झाले. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०-राज्य अभ्यासक्रम आराखडा – अंमलबजावणी (शालेय शिक्षण) या विषयावर त्यांनी बीजभाषण दिले. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार मूल्यमापन व अध्यापनाचा बदलता दृष्टिकोन अशा दोन विषयांवर सत्रे घेतली. मा. श्री. हरीभाऊ बागडे, राज्यपाल, राजस्थान यांच्या उपस्थितीमध्ये कार्यशाळेचे उद्घाटन झाले. जिल्हाधिकारी श्री. श्रीकृष्ण पांचाळ (IAS) हे कार्यक्रमास उपस्थित होते. जालना जिल्ह्यातील सुमारे ३५० शिक्षक या दोन दिवसांच्या कार्यशाळेत सहभागी झाले.

- **समाज शिक्षक पुरस्कार –** कृ. ब. उर्फ अण्णा तळवलकर मेमोरियल ट्रस्टच्या वतीने ज्ञान प्रबोधिनी प्रज्ञा मानस संस्थेच्या प्रमुख व ज्येष्ठ मानसशास्त्र संशोधिका डॉ. अनघा लवळेकर यांना समाजशिक्षक हा मानाचा पुरस्कार ले. जनरल (निवृत्त) सुदर्शन हसबनीस यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

## ★ समावेशकता ★

### ❖ प्रज्ञा मानस संशोधिका

शालेय मानसशास्त्र पदव्युत्तर पदविका व प्रज्ञावंततेचे मानसशास्त्र व जोपासना ह्या दोन्ही अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांकरिता तसेच प्रशालेतील शिक्षक, दलावरचे ताई-दादा यांच्यासाठी "Existential Crisis and High Ability Learners' या विषयावर मृण्मयी अडावदकर आणि मेघना गोखले यांनी सत्र घेतले. यामध्ये "Theory to practice' असा आवाका घेण्यात आला.

## ★ नवोन्मेषता ★

### ❖ प्रज्ञा मानस संशोधिका

मनोमापन विभागातर्फे iTap चाचणी मराठीमध्ये करण्याचे काम Moodle सॉफ्टवेअर वर सुरू आहे. संपूर्ण चाचणी संच (१७ उपचाचण्या) Moodle वर मराठीमध्ये तयार आहे.

## ★ सेतुबंधन ★

### ❖ प्रज्ञा मानस संशोधिका

सौर वैशाख १३ (३ मे) रोजी 'Learning Enhancement Program' म्हणजे उपचारात्मक अध्यापनासाठी येणाऱ्या मुलांचे गंमत शिबिर सकाळी १० ते ५ या वेळेत आयोजित केले होते. यात एकूण २५ मुले सहभागी झाली होती. यात या विशेष मुलांसाठी 'हस्त-नेत्र समन्वय', 'एकाग्रता', 'भाषा विकास', 'स्मृती विकास' या उद्दिष्टांवर काही खेळ आणि कृतिकार्ये घेतली. त्याच दिवशी २ ते ५ या वेळेत या मुलांच्या पालकांसाठी विशेष मार्गदर्शन सत्रे घेतली. या सत्रांसाठी वा. उमाताई बापट यांनी 'विशेष मुलांचा सर्वांगीण विकास' या विषयावर आणि ज्योतीताई केमकर यांनी 'NIOS Board, त्याबद्दलचे समज गैरसमज' या विषयावर पालकांना मार्गदर्शन केले.

## ★ प्रभाव ★

### ❖ ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे

विश्वकर्मा इंस्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (VIT) येथे प्रशालेच्या गटाने 'राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०' व 'नैपुण्याधारित शिक्षण' याविषयी शिक्षकांचे प्रशिक्षण घेतले.

- सविस्तर वृत्त छायाचित्राला जोडले आहे.

### ❖ शैक्षणिक साधन केंद्र

**प्रबोध आभासी प्रयोगशाळा –** सौर ३ वैशाख (२३ एप्रिल) या दिवशी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सोनुर्ली विद्यालयात ज्ञान प्रबोधिनी शैक्षणिक साधन केंद्र निर्मित कोकणातील पहिल्या प्रबोध आभासी प्रयोगशाळेचे उद्घाटन सिंधुदुर्ग जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्थेचे (डाएट) प्राचार्य मा. राजेंद्र कांबळे आणि माध्यमिक शिक्षणाधिकारी मा. कविता शिंपी यांच्या हस्ते झाले. यावेळी जिल्ह्यातील शाळांचे मुख्याध्यापक, ७५ शिक्षक, २५० विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी शिक्षकांची कार्यशाळा घेण्यात आली. तसेच विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष विज्ञान प्रयोग आणि Augmented Reality, Virtual Reality (VR) यांचा अनुभव देण्यात आला.

इचलकरंजी येथील विद्योदय संस्था कलाम फिरती प्रयोगशाळा येथे प्रबोध आभासी प्रयोगशाळा सुरू करण्यात आली. यावेळी २० कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण घेण्यात आले. सौर १० वैशाख (३० एप्रिल) रोजी 'स्व'-रूपवर्धिनी, पुणे येथे प्रबोध आभासी प्रयोगशाळा देण्यात आली. यावेळी फिरत्या प्रयोगशाळेच्या कार्यकर्त्यांना VR संच वापरण्याचे प्रात्यक्षिक दाखवले. पुण्यातील १०० शाळांमध्ये 'स्व'-रूपवर्धिनीची फिरती प्रयोगशाळा काम करीत आहे; त्यात प्रबोध आभासी प्रयोगशाळा लवकरच सुरू होईल. Meta store वर प्रबोध आभासी प्रयोगशाळा इंग्रजी आणि मराठी माध्यमासाठी प्रकाशित करण्यात आली. ज्या शाळा, संस्था, केंद्र, विद्यार्थी यांच्याकडे VR संच उपलब्ध आहेत ते Meta store वरून ॲप विकत घेऊन प्रयोग करू शकतात.

<https://www.meta.com/en-gb/experiences/search/?q=science%20lab>

### ❖ प्रज्ञा मानस संशोधिका

महिंद्रा आणि महिंद्रा, चाकण कंपनीमधील महिला कामगारांसाठी 'यशस्विनी' हा प्रशिक्षण वर्ग सौर चैत्र २५ आणि २७ (१५ आणि १७ एप्रिल) रोजी झाला.

यंदाच्या वर्षी बाल विकास शिबिराचा सूत्र विषय 'सर्जनशील विचार' असा असणार आहे; बाल विकासच्या चारही शिबिरांची नोंदणी संपली आहे. पहिल्या शिबिरात एकूण १०७ मुलांचा सहभाग होता. दुसऱ्या शिबिरात एकूण १०३ मुले, तिसऱ्या शिबिरात ११० मुले व चौथ्या शिबिरात ७३ मुलांची नोंदणी झाली आहे. एकूण ३९३ मुलांची नोंदणी झाली आहे.

### ◈ ज्ञान प्रबोधिनी, निगडी केंद्र ◈

**सौर वैशाख ११ (१ मे) रोजी क्रीडाकुलचा माजी विद्यार्थी शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त जिम्नॅस्टिक चॅम्पियन गणेश नवले याचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. त्याची क्रीडाकुल मध्ये झालेली जडण-घडण व त्याचा आत्तापर्यंतचा प्रवास गणेश दादाने आपल्या मनोगतातून मांडला. मा. देवळेकर व प्राचार्य विद्याताई यांनी गणेशचा सत्कार केला.**

# अभिनंदन

**✱ स्पर्धा परीक्षा केंद्र**

▷ **यूपीएससी २०२४ च्या परीक्षेत केंद्राचे १९ विद्यार्थी यशस्वी झाले. त्यांची विविध अधिकारी पदावर नियुक्ती झाली.**

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| शिवांश जागडे | अपूर्वा बालपांडे | रोहन पिंगळे | आदित्य बामणे | ऋषिकेश वीर | सचिन लांडे | |
| तेजस्वी देशपांडे | पंकज औटे | बिरदेव डोणे | आनंद सदावर्ते | मानसी साकोरे | राजू वाघ | |
| तेजस सारडा | नितीन बोडखे | सौरव ढाकणे | कृष्णा पाटील | संपदा वांगे | अंकिता पाटील | अजय सरवदे |

▷ **एमपीएससी २०२३ च्या परीक्षेत केंद्राचे सहा विद्यार्थी यशस्वी झाले.**

शर्विका राऊत  हरिदत्त माने  तब्बसुम सय्यद  हनुमंत कोळसे  हरी पालवे  सुधीर पाटील

## ✴ शालान्त परीक्षा निर्णय २०२४-२५ ✴

**✱ ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे**

▷ निकाल शंभर टक्के लागला आहे.

▷ **पहिले पाच विद्यार्थी** - आदिजा सुतार ९८.४%, नारायणी टिळेकर ९८%, यशोवर्धन बागुल ९७.८%
नील शहा ९७.६%, अद्वय पळणीटकर ९७.४%, अनीश राजवाडे ९७.४%

**✱ ज्ञान प्रबोधिनी, निगडी केंद्र**

| मराठी माध्यम | इंग्रजी माध्यम | गुरुकुल विभाग | क्रीडाकुल विभाग |
|---|---|---|---|
| १. पर्णवी कुलकर्णी ९९.६०% | १. जुई देशमुख ९७.२०% | १. स्वराज बालवडे ९८.२०% | १. निहारिका ढाणे ८८.६०% |
| २. चैतन्य दीक्षित ९९% | २. सारंग मायदेव ९७% | सुजल राऊत - ९८.२०% | २. अर्जुन पाटणकर ८८.४०% |
| ३. शर्वरी गुर्जर ९८.६०% | ३. आर्यन भरगुडे ९०% | २. अवधूत भागानगरे - ९६.६०% | ३. सिद्धी गुरव ८५.४०% |
| | | ३. नचिकेत पंडित - ९५.८०% | |

**✱ ज्ञान प्रबोधिनी, साळुंब्रे उपकेंद्र**

▷ **इयत्ता १२वी (वाणिज्य विभाग) विद्यालयाचा निकाल - ७८.३७ %**

१. प्रथम - रसिका विधाटे ७५%, धम्मप्रिया वाघमारे ७५%  २. द्वितीय - श्रेया धवणे ६९%  ३. तृतीय - अश्विनी तेलंगे ६२%

▷ **इयत्ता १०वी निकाल १००%**

१. प्रथम - मैथिली सावंत ९१.४०%  २. द्वितीय - लावण्या टेमगिरे ८९.८०%  ३. तृतीय - पायल डोके ८९.२०%.

**✱ ज्ञान प्रबोधिनी सोलापूर केंद्र**

▷ प्रशालेचा १००% निकाल लागला. प्रथम तीन क्रमांक पुढील प्रमाणे.

१) प्रथम - श्रावणी काळे ९७.६०%  २) द्वितीय - कपिल सावंत ९६.६०%  ३) तृतीय - शुभम स्वामी ९६ %

**✱ ज्ञान प्रबोधिनी हराळी केंद्र -**

प्रथम - अंजली देवकर ९४.२०%  द्वितीय - कार्तिक राठोड ९३.४०%  तृतीय - दीपक माने ९१% व वैभवी बिराजदार ९१%

# - अभिनंदन -

### ◈ ज्ञान प्रबोधिनी, साळुंब्रे उपकेंद्र ◈

**व्यवसाय योजना स्पर्धेत यश -** शेतीविषयक प्रशिक्षणाद्वारे भारताच्या कृषी क्षेत्रातील भविष्याचे नायक घडविणाऱ्या फाली (फ्युचर ॲग्रीकल्चर लीडर्स ऑफ इंडिया) या संस्थेचे अकरावे संमेलन सौर वैशाख ७ ते १४ (२७ एप्रिल ते ४ मे) दरम्यान जळगाव येथे पार पडले. महाराष्ट्र व मध्यप्रदेश या दोन राज्यांतील ३५० हून अधिक विद्यार्थी या संमेलनात सहभागी होते. या संमेलनात ग्राम प्रबोधिनीने सहभाग घेतला होता. विद्यालयातील राहुल सुसर, निखिल माने व संस्कार सावंत या विद्यार्थ्यांच्या गटाने सादर केलेल्या ''कोरडी भाजीपाला पावडर'' या प्रकल्पाच्या सादरीकरणाने व्यवसाय योजना स्पर्धेत तिसऱ्या टप्प्यात दोन्ही राज्यांत प्रथम क्रमांक मिळवला. निखिल ढोबळे, प्रथमेश कुंभार या आपल्याच विद्यार्थ्यांनी कृषी मॉडेल स्पर्धेत बहुउपयोगी शेती यंत्र सादर केले तर विद्यालयाचा देविदास देशमुख याची उत्कृष्ट विद्यार्थी म्हणून निवड झाली.

- **वृक्ष मित्र उपक्रम -** सविस्तर वृत्त छायाचित्राला जोडले आहे.
- **उन्हाळी शिबिर व प्रशिक्षण -** सविस्तर वृत्त छायाचित्राला जोडले आहे.

### ❖ स्पर्धा परीक्षा केंद्र

**सीमावर्ती आणि महत्त्वाकांक्षी राज्यांतील उपक्रम :** छत्तीसगड मधील 'नेतृत्व साधना केंद्र' च्या स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वा. सविता कुलकर्णी यांनी अभ्यास पद्धती (Study Steps), आणि परिप्रेक्ष्य निर्माण (Perspective Building) या विषयांवर दूरस्थ माध्यमातून एकूण चार सत्रे घेतली.

### ❖ नैसर्गिक संसाधने विभाग

**पाणी साठवण टाकी बांधकाम :** पुणे जिल्ह्यातील वेल्हे तालुक्यातील खोपडेवाडी-पळसगाणी आणि मळे-नाकतेवाडी येथे पंधरा हजार लिटर क्षमतेच्या पाणी साठवण टाक्यांचे  बांधकाम पूर्ण करण्यात आले. नाशिक जिल्ह्यातील पेठ तालुक्यातील आडगाव ग्रामपंचायतीतील वरची वस्ती आणि उंबरपाडा, कहांडोळपाडा ग्रामपंचायतीतील देवळाचा पाडा तसेच तोंडवळ ग्रामपंचायतीतील शिदमाळ या चार ठिकाणी वीस हजार लिटर क्षमतेच्या पाणी साठवण टाक्यांचे बांधकाम पूर्ण करण्यात आले. यात स्थानिक ग्रामस्थांनी श्रमकार्य केले. नाशिक जिल्ह्यातील कामे ही प्रामुख्याने आदिवासी जनजाती समाजासाठी करण्यात येत आहेत. सोलापूर जिल्ह्यातील रेडे गावातील ईजाळवस्ती (कोळेकरवस्ती) आणि फडतरी गावातील पाटीलवस्ती व लवटेवस्ती या तीन ठिकाणी पंधरा हजार लिटर क्षमतेच्या पाणी साठवण टाक्यांचे बांधकाम ग्रामस्थांच्या सहभागातून नुकतेच पूर्ण करण्यात आले.

नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी तालुक्यातील शेनवड (शिवाची वाडी) व इंदोरे (खाडे वस्ती) येथे साठवण टाकीच्या सळईचा सांगाडा बांधण्याचे काम ग्रामस्थांच्या सहभागातून नुकतेच पूर्ण करण्यात आले. त्यासाठी गावातील महिला व पुरुषांनी श्रमकार्य केले. नाशिक जिल्ह्यातील पेठ तालुक्यातील काहांडोळपाडा ग्रामपंचायतीतील देवळाचा पाडा व सावर्णा या दोन गावांतील टाकीच्या लोकार्पणाचा कार्यक्रम केपीआयटी टेक्नॉलॉजीजचे सीएसआर प्रमुख श्री. तुषार जुवेकर यांच्या हस्ते नुकताच पार पडला.

### ❖ ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे

इ. ७वी ते ९वी या वर्गांचे  वार्षिक निर्णय या वर्षी पहिल्यांदाच 'पालक- अध्यापक-विद्यार्थी ' असे एकत्रित संवाद दिन या स्वरूपात जाहीर केले. यावेळी  सत्र १ व सत्र २ च्या गुणांचे मूल्यमापन, सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन व नैपुण्याधारित मूल्यमापनाचे अहवाल आपण निकालाच्या वेळी दिले. अध्यापक-पालक-विद्यार्थी असा एकत्रित संवाद असल्याने संवाद थेट होऊ शकला. प्रत्येक इयत्तेनुसार त्या त्या दिवशी शिक्षक-पालक-विद्यार्थी यांची एकत्रितपणे वर्षान्त उपासनाही झाली.

### ❖ शैक्षणिक उपक्रम संशोधिका

- प्रज्ञा विकास पुणे प्रकल्प (पाच केंद्र) - सविस्तर वृत्त छायाचित्राला जोडले आहे.
- छोटे सायंटिस्टस् प्रकल्प - सविस्तर वृत्त छायाचित्राला जोडले आहे.
- **LearnEng** प्रकल्प - सविस्तर वृत्त छायाचित्राला जोडले आहे.

**विकासमित्र (वेल्हे – पानशेत) प्रकल्प –** प्राथमिक विकासिका/प्रशिक्षण - सौर वैशाख १८ (८ मे) रोजी चौदा शिक्षणदूतांना गावपातळीवरील विद्यार्थ्यांचे शिबिर घेणे व शिबिराचे नियोजन कसे करावे, सद्य परिस्थितीचे ज्ञान विद्यार्थ्यांना अवगत करून देणे यासाठी प्रशिक्षण घेतले.

### ❖ कौशल्य प्रशिक्षण केंद्र, शिवापूर

**औद्योगिक प्रशिक्षण :** दि. ९ डिसेंबर २०२४ पासून लेथ मशिन तुकडीमधील दहा विद्यार्थी पुणे येथे AASK ME Precision Engineers, Pune येथे नियमित सकाळी ९ ते ५ पर्यंत प्रशिक्षण घेण्याकरिता जात होते. त्यांचे नट बोल्ट व फास्टनर तयार करण्याचे युनिट आहे. त्यामध्ये मुलांना सर्व प्रकारची मशिनरी चालविण्याचा अनुभव मिळाला.

**छोटे इंजिनिअर्स उन्हाळी शिबिर २०२५ :** या शिबिरात एकूण चौदा विद्यार्थी सहभागी झाले होते. हे शिबिर अत्यंत माहितीपूर्ण आणि तांत्रिक कौशल्य विकसित करणारे ठरले.

- छोटे इंजिनिअर्स उन्हाळी शिबिर २०२५ - सविस्तर वृत्त छायाचित्राला जोडले आहे.

### ❖ स्त्री-शक्ती प्रबोधन, ग्रामीण

**किशोर – किशोरी विकास उपक्रम –  विद्याव्रत शिबिर आणि दीक्षा ग्रहण समारंभ** -असौर वैशाख १३ ते १५ (३ ते ५ मे) असे तीन दिवस विद्याव्रत शिबिर वेल्हे येथे घेण्यात आले. दोन दिवसांच्या शिबिरात विद्याव्रताची पूर्वतयारीची चार सत्रं झाली. कृतीकार्य, खेळ, छोटी चित्रफीत बघणे, झाडांचे निरीक्षण, प्रसंग नाट्य अशा स्वरूपात पूर्वतयारी झाली. याच बरोबर रात्री मुलांसाठी आकाशदर्शन आयोजित करण्यात आले. यामध्ये हिरकणी मार्गदर्शिकांची मुलं-मुली १४, सहनिवास मुली ३, पासली भागातील १ अशी एकूण अठरा मुलं-मुली सहभागी होती.

**हिरकणी प्रशिक्षक प्रशिक्षण –** वेल्हे तांबे संकुल येथे सौर वैशाख १४ व १५ (४ व ५ मे) असे दोन दिवसीय हिरकणी प्रशिक्षक प्रशिक्षण झाले. प्रस्तावनेच्या सत्रात सुवर्णाताईंनी प्रत्येक गोष्टीत नाविन्यपूर्ण काहीतरी करता आले पाहिजे, मुलांसाठीच्या वेगवेगळ्या गोष्टी कशा करता येतील अशी मांडणी केली. सत्रातील माता पालिकांचे निरीक्षण व नोंदी यावर माधुरीताई कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले. हिरकणीतील प्रबोधिनीपण यावर आदरणीय संचालकांनी घरातील वातावरण आणि त्याचा मुलांवर होणारा परिणाम, घरातील वाचनाचे वातावरण, अतिथींचे

स्वागत, वरिष्ठ मंडळींचा आदर अशा पाच मुद्द्यांवर मार्गदर्शन केले. हिरकणी प्रकल्प आधारित प्रश्नोत्तराच्या माध्यमातून वा. उमाताई बापट यांनी दूरस्थ सत्र घेतले. दुसऱ्या दिवशीच्या सत्रात हिरकणी आणि स्त्री-शक्ती कार्यदिशा याविषयी वंदनाताई कामठे यांनी आणि बाल आरोग्य आणि आहार याविषयी डॉ. आसावरी पाटील यांनी गटाला उदाहरणे देऊन मार्गदर्शन केले. बदलापूर, सोलापूर, हराळी, भोर, वेल्हे, शिक्रापूर इत्यादी ठिकाणावरून एकूण ३५ जणी प्रशिक्षणात सहभागी झाल्या होत्या.

### ❖ स्त्री-शक्ती प्रबोधन, शहरी (मध्यवर्ती संवादिनी)

**उमलत्या वयाशी जुळवून घेताना** – १) प्रज्ञा विकास शिबिर संख्या ९० २) विद्याव्रत संस्कार शिबिर संख्या ४१ ३) सहजीवन कार्यशाळा- माहेश्वरी समाज महिला संघटना, लातूर संख्या - ५०

**विद्याव्रत संस्कार शिबिर** – सौर वैशाख १४ ते २१ (४ ते ११ मे) या कालावधीत ज्ञान प्रबोधिनी वास्तूत उपासना मंदिरात विद्याव्रत संस्कार शिबिर झाले. या वर्षी ४१ मुलांनी विद्याव्रताची दीक्षा घेतली. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉक्टर भावार्थ देखणे हे होते.

सौर चैत्र २७ (१७ एप्रिल) रोजी समतोलचा आदरणीय स्वर्णलता ताई भिशीकर स्मृती विशेषांक प्रकाशित झाला.

**निरामय निवासी शिबिर २०२५** – संवादिनी सहभागी सदस्या ९, शिबिर विषय : मी आणि माझा वर्ग, SWOT Analysis, क्षमता, कमतरता व माझे स्वप्न. शिबिरात इयत्ता नववी ते बारावीच्या एकूण १२५ विद्यार्थिनी सहभागी झाल्या होत्या.

**पौडरस्ता व औंध संवादिनी गट –** या दोन्ही गटांनी मिळून सौर चैत्र २७ ते वैशाख ४ (१७ ते २४ एप्रिल) या कालावधीत महेश विद्यालय - सेमी इंग्रजी माध्यम, कोथरूड येथे इ. आठवीच्या मुलांचे विद्याव्रत शिबिर घेतले. सौर वैशाख ५ (२५ एप्रिल) रोजी सकाळी दीक्षा ग्रहण समारंभ झाला. या शिबिरात आठवीची ४६ मुले सहभागी झाली होती. शिबिरापूर्वी पालक मेळावा घेऊन पालकांना या शिबिराविषयी माहिती दिली, त्यांचे शंकानिरसन केले. सुरुवातीला विद्याव्रत म्हणजे काय व शिबिरात काय घेतले जाणार आहे याची ओळख मुलांना करून दिली. त्यानंतर रोज एका विकसनावर सत्र घेतले. या सत्रांमधे व्याख्यान, पीपीटी द्वारे विषय घेणे, गटचर्चा, नाटिका, खेळ, छोटी चित्रफीत, video clips अशा गोष्टींचा समावेश केला होता. रोजच्या विषयाशी संबंधित पद्य तसेच श्लोकांचा सराव घेत होतो. त्यासाठी मुलांना पहिल्या दिवशीच त्याच्या प्रती काढून दिल्या होत्या. दोन्ही गटांतील सोळा जणींनी मिळून हे शिबिर घेतले.

### ❖ शिक्षक प्रशिक्षण केंद्र

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी द्वारा आयोजित नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण या विषयावर आयोजित परिसंवादात प्रा. प्रशांत दिवेकर अभ्यागत वक्ते म्हणून सहभागी झाले होते. सामाजिक शास्त्र अध्ययनातील अध्ययन उद्दिष्टे आणि नाविन्यपूर्ण अध्ययन-अध्यापन पद्धती या विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले.

विद्या प्रबोधिनी, नाशिक यांच्या प्राथमिक अध्यापकांसाठी दोन दिवसीय प्रशिक्षण वर्ग घेण्यात आला. अध्ययन पद्धती आणि अध्ययन निष्पत्ती, समुपदेशन आदी विषयांवर स्मिता मने, गुंजन कुलकर्णी, नचिकेत नित्सुरे आणि प्रा. प्रशांत दिवेकर यांनी सत्रे घेतली.

सौर वैशाख १० ते १२ (३० एप्रिल ते २ मे) या कालावधीत दयानंद अंग्लो वैदिक स्कूल यांच्या ४० अध्यापकांसाठी प्रकल्प पद्धतीची ओळख या विषयावर तीन दिवसीय कार्यशाळा घेण्यात आली. प्रकल्पासाठी अध्ययन कौशल्ये, प्रकल्प प्रकार : संग्रह आणि सर्वेक्षण या विषयांवर प्रशिक्षण आणि वार्षिक कार्यक्रम याची योजना आखण्यात आली. सुरेंद्र ठाकूरदेसाई आणि प्रशांत दिवेकर यांनी मार्गदर्शन केले.

### ❖ डोंबिवली विस्तार केंद्र

सौर वैशाख ७ व ८ (२७ व २८ एप्रिल) या दिवशी दोन दिवस एक रात्र असे निवासी शिबिर बदलापूर येथे घेण्यात आले. यामध्ये नऊ विद्यार्थी सहभागी झाले होते.

स्थळ भेटी - १) वीट भट्टी-विटा कशा बनवतात याची इत्यंभूत माहिती मुलांनी विविध प्रश्नाद्वारे मिळवली. २) राईस मिल- मिलचे मालक आत्माराम यांनी मुलांना माहिती दिली. ३) देवळोली गावात शिवकालीन चावीच्या आकाराच्या विहीरीची माहिती मुलांनी करून घेतली. सार्जंट दीपकजी गद्रे आणि श्री. पितांबर जडे यांच्या भेटी झाल्या. याशिवाय कृतीसत्र, गटकार्य, ६ व्रते, चरित्रकथन, गीते, उपासना, व्यायाम ही सत्रे झाली. शिबिर काळात दिवसभरातील जबाबदाऱ्या गटागटाला वाटून दिल्या होत्या. सौर वैशाख ११ (१ मे) ला टिळक नगर शाळेमध्ये संध्याकाळी पाच ते साडेसात या वेळात दहा विद्याव्रतींवर विद्याव्रत संस्कार झाला. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. सौ. प्राचीताई दामले होत्या.

### ❖ ज्ञान प्रबोधिनी सोलापूर केंद्र

**माध्यमिक विभाग :** सौर वैशाख १७ ते २१ (७ ते ११ मे) या दरम्यान महाराष्ट्रातील विविध शहरांतील शाळांमधील अध्यापकांसाठी 'रूप पालटू शिक्षणाचे' या निवासी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये ३५ अध्यापक सहभागी झाले होते.

**इतर विभाग – प्रशिक्षणातून सक्षमता** – प्रिसिजन कॅम्पशाफ्ट लिमिटेड सोलापूर तर्फे दि. १ एप्रिल २०२४ पासून शिलाई प्रशिक्षण सुरू झाले. वर्षभरात ३० महिला या प्रशिक्षणाने सक्षम झाल्या. त्यातील महिला स्वतः ऑर्डर मिळवून तसेच पिशव्या शिवून चांगल्या प्रकारे कमवत आहेत. प्रशिक्षित ३० महिलांचे एकत्रीकरण व त्यातील पाच अत्यंत गरजू महिलांना मशीन वाटप कार्यक्रम झाला.

**युवक विभाग–** सहजीवन शिबिर – सौर चैत्र २३ ते २६ (१३ ते १६ एप्रिल) या कालावधीत इ. सातवीतील मुला-मुलींचे सहजीवन शिबिर उत्साहात पार पडले. अग्निगोलातून उड्या, उंचीवरून बारक्याशा बांबूवरून चालणे, कुस्ती, रस्सा, लाठीकाठी, कराटे इत्यादी साहस प्रकार विद्यार्थ्यांनी अनुभवले. शिवचरित्र कथन स्फूर्तीदायी झाले. दलावर क्रीडा स्पर्धा चुरशीच्या झाल्या. मनोरंजनामध्ये गमतीचे खेळ, आयत्या

वेळेची नाटके व खजिना शोध यातून मुलांनी भरपूर मजा केली. यात प्रशालेतील ३६ मुले, मणिपूर सहानिवासातील ९ मुले, १६ युवक व ३८ मुली आणि पाच युवती सहभागी होत्या.

**प्रबोधिनीच्या तंत्र प्रशिक्षण वर्गातून संगणकाचे नि:शुल्क प्रशिक्षण झालेल्या आयटीआयच्या युवक– युवतींना प्रशस्तिपत्र वाटप –** डिसेंबर २०२४ ते मार्च २०२५ या कालावधीत युवक–युवतींनी कौशल्य प्रशिक्षित व रोजगारक्षम व्हावे यादृष्टीने आयटीआयच्या विद्यार्थी–विद्यार्थिनींना संगणकातील Linux Arduino =41, Revit- 21 याचे नि:शुल्क प्रशिक्षण देण्यात आले. एकूण ६२ विद्यार्थी–विद्यार्थिनी यात सहभागी होते. या विद्यार्थ्यांना सौर २६ चैत्र (१६ एप्रिल) रोजी ज्ञान प्रबोधिनीच्या चैतन्य भवन या वास्तूत प्रशस्तीपत्र देण्याचा कार्यक्रम झाला. प्रशिक्षितांनी LDR sensor security, Bluetooth control robot, 2D 3D designing walkthrough या विषयावरील प्रकल्प सादर केले.

- पुढील वृत्ते छायाचित्राला जोडलेली आहेत.

१. युवकांची पर्वतारोहणातून हिमालयाशी गट्टी व रामायणातून वीरतेची प्रेरणा – वीरव्रत सहल २०२५

२. मणिपूर – प्रशिक्षणातून संवाद, संवादातून मैत्री    ३. आविष्कार मणिपुरी स्पंदनांचा

### ❖ नागरी वस्ती अभ्यासगट

आनंदी शिक्षण प्रकल्पातील एकूण २० मुलांनी शैक्षणिक साधन केंद्रातील फिल्म मेकिंग या तीन दिवसाच्या उपक्रमामध्ये सहभाग घेऊन नवीन गोष्टीचा अनुभव घेतला. ज्ञान प्रबोधिनी मुक्त विद्यापीठ केंद्रामार्फत Innovation and Creativity प्रशिक्षण वर्ग आयोजित केला होता. याध्ये एकूण तीन मुलींनी सहभाग घेतला. या वर्गाच्या माध्यमातून मुलींना अनेक गोष्टी शिकायला मिळाल्या.

युवती मेळावा सौर वैशाख २१ (११ मे) रोजी ३ ते ७ या वेळामध्ये झाला. एकूण अठरा जणी सहभागी झाल्या. पद्यगायन, देशातील सद्यस्थितीवर गटचर्चा, माझी गोष्ट– काल–आज–उद्या या सत्रामध्ये पाच युवतींनी स्वतःच्या घडणीचा प्रवास मांडला.

### ❖ ज्ञान प्रबोधिनी, निगडी केंद्र – • गुरुकुल स्नेहसंमेलन – सविस्तर वृत्त छायाचित्राला जोडले आहे.

### ❖ युवक विभाग, पुणे

**भारत व इस्लाम : विशेष व्याख्यान** – काश्मीर येथे झालेल्या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर 'हिंदुस्थान आणि इस्लाम' या विषयावर सौर वैशाख १३ (३ मे) रोजी शुभंकरदादा केळकर याचे व्याख्यान झाले. इस्लामचा सुरुवातीपासूनचा इतिहास, भारतावरच्या स्वाऱ्या, इथल्या संस्कृतीवर त्याचा झालेला व होत असलेला परिणाम यावर दादाने मांडणी केली. द्वेषरहित आक्रमक हिंदुत्व मांडत जगण्याचे आवाहन त्याने सर्वांना केले. १०० सदस्य उपस्थित होते.

**एअर व्हाईस मार्शल किरण पळसुले (निवृत्त) यांची भारताच्या हवाई संरक्षण आणि प्रत्युत्तर धोरणावर विशेष मुलाखत –** सौर वैशाख २० (१० मे) रोजी पहलगाम हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर एअर व्हाईस मार्शल किरण पळसुले (निवृत्त) यांच्यासोबत संवाद सत्राचे आयोजन ज्येष्ठ पत्रकार आनंद आगाशे यांच्या मार्गदर्शनाखाली केले होते.

- सविस्तर वृत्त छायाचित्राला जोडले आहे.

**नेतृत्व विकसन शिबिर –** सौर चैत्र २८ ते ३० (१८ ते २० एप्रिल) या कालावधीत नेतृत्व विकसन शिबिर झाले. शिबिरात २२ शाळांमधील ३७ विद्यार्थी आणि सहा मार्गदर्शक सहभागी झाले होते.

**धमाल शिबिर २०२५** – ज्ञान प्रबोधिनी युवक विभागाने मे महिन्यात धमाल शिबिराचे आयोजन केले होते. यंदाचे हे धमाल शिबिराचे सलग तिसरे वर्ष आहे. या वर्षीचे धमाल शिबिर कोथरूड, सिंहगड रोड, सहकारनगर व पेठ भाग या चार भागांत झाले. या वर्षी २०० मुलांनी नोंदणी करून उत्तम सहभाग नोंदवला.

**निषेध सभा –** 'मुझे फर्क पडता है क्योंकी ये देश मेरा है'. पहेलगाम इथे झालेल्या क्रूर अशा दहशतवादी हल्ल्याचा निषेध दर्शविण्यासाठी सौर वैशाख ४ (२४ एप्रिल) रोजी प्रबोधिनीमध्ये निषेध सभा झाली. ४००–४५० लोकांनी उपासना मंदिर व बाहेरचा चौक पूर्ण भरून गेला होता. घडलेल्या घटनेबाबत तीव्र भावना अनेकांच्या होत्या. सभेची सुरुवात भारत के जवानो या जोशपूर्ण पद्याने झाली. स्वप्नीलदादाने, काही दहशतवादी मारून हा विचार संपणार नाहीये, आपल्याला तो हिंसक, आक्रमक, असंस्कृत असलेला विचारच संपवल्याशिवाय शांतता येणार नाही असा मुद्दा मांडला. ''आम्हास काय त्याचे'' यातून आपल्याला बाहेर पडून, घराबाहेर पडून काम करायला लागेल असे सांगितले. त्यानंतर या भ्याड हल्ल्यात निधन पावलेल्या नागरिकांना गीतेतील श्लोक म्हणून सगळ्यांनी श्रद्धांजली वाहिली.

### ❖ ज्ञान प्रबोधिनी, हराळी केंद्र

सौर वैशाख १० (१ मे) रोजी मा. लताताई यांच्या पहिल्या स्मृतिदिनानिमित्त या वर्षातला शेवटचा उत्तरदायी सदस्य मेळावा, वर्षांत उपासना आणि प्रतिज्ञा ग्रहण कार्यक्रम झाला. मेळाव्यात सर्वसाधारण प्रबोधिनीपणातील 'गुणवत्तेत तडजोड नाही' आणि 'रोज काहीतरी नवीन सुचलेच पाहिजे'. या दोन सूत्रांच्या आधारे मा. गौरीताईंनी सत्र घेतले. त्यानंतर व्यक्ती परिचय म्हणून कै. आ. लताताई यांच्या कार्याविषयीचा परिचय करून देणारे सत्र निखिलदादा यांनी घेतले. त्यांनतर केंद्राचा वर्षांत समारंभ कार्यक्रम व प्रतिज्ञा ग्रहण कार्यक्रम झाला. मा. संचालकांनी चौदा सदस्यांना प्रथम आणि दोन सदस्यांना द्वितीय प्रतिज्ञा दिली.

**कृषी विद्यालय आणि शेती :** आंब्याचे उत्पादन चांगले झाले. १६५० डझन आंबा उत्पादन झाला.

**प्रदेश विकसन विभाग :** सय्यद हिप्परगा गावातील फेरोसिमेंट टाकीचे काम श्रमदानातून पूर्ण झाले. जलतारा हा नवीन प्रकल्प सुरू करण्यात

(पान क्र. ७ , ८ व ९ या पानांवरील छायाचित्रांना त्यासंबंधीचे वृत्त जोडले आहे. छायाचित्राला स्पर्श केल्यास वृत्त वाचता येईल.)

# सौर वैशाख १९४७ मधील प्रकाशचित्रे



ज्ञान प्रबोधिनी, हराळी – प्रतिज्ञा ग्रहण



चेन्नई येथे मार्गदर्शन करताना ज्ञान प्रबोधिनीचे संचालक मा. गिरीश बापट




आभासी प्रयोगशाळा, विद्योदय संस्था, इचलकरंजी




निगडी, क्रीडकुल माजी विद्यार्थी गणेश नवले शिवछत्रपती पुरस्काराने सन्मानित



कौशल्य प्रशिक्षण केन्द्र, शिवापूर – उन्हाळी शिबिर




ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे – विश्वकर्मा प्रशिक्षण वर्ग




जालना येथील राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंमलबजावणी कार्यशाळेत मा. प्राचार्य मिलिंद नाईक सहभागी झाले.




डोंबिवली विस्तार केंद्र – विद्याव्रत संस्कार



युवक विभाग पुणे - धमाल शिबिर




निगडी गुरुकुल स्नेहसंमेलन



ज्ञान प्रबोधिनी, साळुंब्रे - वृक्षमित्र



ज्ञान प्रबोधिनी, सोलापूर - वीरव्रत सहल



ज्ञान प्रबोधिनी, हराळी - प्रदेश विकसन




सावर्णा (ता. पेठ) येथील टाकीच्या लोकार्पणाचा कार्यक्रम



ज्ञान प्रबोधिनी, सोलापूर - महाराष्ट्रातील विविध शहरांतील शाळांमधील अध्यापकांसाठी 'रूप पालटू शिक्षणाचे' निवासी शिबिर



सहनिवासातील मणिपुरी विद्यार्थ्यांचे 'ने मजसी ने परत मातृभूमीला' हे गीतगायन सादरीकरण




ज्ञान प्रबोधिनी, सोलापूर - हैरोक प्रशिक्षण केंद्र




शैक्षणिक उपक्रम संशोधिका - LearnEng प्रकल्प उन्हाळी वर्ग



एअर व्हाईस मार्शल किरण पळसुले (निवृत्त) यांची
भारताच्या हवाई संरक्षण आणि प्रत्युत्तर धोरणावर विशेष मुलाखत



प्रज्ञा विकास पुणे - उन्हाळी शिबिर व सहल



युवक विभाग श्रमदान



ज्ञान प्रबोधिनी साळुंब्रे उपकेंद्र - उन्हाळी शिबिर



छोटे सायंटिस्टस् प्रकल्प - विज्ञान शिबिर